जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/२८७०५६/२०२३

**वाहतुक नियंत्रण अधिसुचना** दिनांक -८ /०८/२०२३

पिंपळे सौदागर भागातील शिवसाई लेन व गोविंद यशदा चौकाजवळील ७ स्टार दरम्यानची पाहणी केली असुन सदर रस्त्याचे दरम्यान कमर्शिअल शॉप व रहिवाशी वस्ती मोठ्या प्रमाणात असुन दाट लोकवस्ती आहे. कमर्शिअल शॉपमध्ये खरेदी करणेकरीता येणाऱ्या ग्राहकांच्या वाहनांची सदर रस्त्यावर मोठी वर्दळ असते सदर नमुद रस्ता अरुंद असुन दोन्ही बाजुने वाहने पार्क झाल्याने वाहतुक कोंडी निर्माण होते तसेच वाहणे पार्क झाल्याने सदर ठिकाणाहुन वाहनांना यु टर्न घेण्यास अडथळा निर्माण होत असुन सदर ठिकाणी किरकोळ व गंभीर स्वरुपाचे अपघात होण्यासाठी शक्यता नाकारता येत नाही.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी काकासाहेब डोळे, पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**<u>सांगवी वाहतुक विभाग अंतर्गत</u>**

| अ.क्र. | ठिकाण | निर्बंध |
|---|---|---|
| १. | शिवसाई लेन व गोविंद यशदा चौकाजवळील ७ स्टार दरम्यान | पी १ पी २ |

तरी वरील ठिकाणी पी १ पी २ झोन घोषीत केलेबाबत आदेश (नोटीफिकेशन) करण्यात येत आहे.

सदर अधिसुचनेची अमंलबजावणी ०८/०८/२०२३ पासुन करण्यात येत आहे.

(काकासाहेब डोळे)
पोलीस उप-आयुक्त,परि २
अति. कार्य वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१. ८/८/८

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी सांगवी वाहतुक विभाग

४) कार्याकारी अभियंता ड क्षेत्रीय कार्यालय पिंपरी चिंचवड महानगरपालिका
/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned with CamScanner